# प्रेसनोट

## सासुने दिली जावयाला मारण्याची सुपारी, आरोपी अटकेत

दि.२४/०६/२०१८ रोजी भारती विदयापीठ पोलीस ठाणे हददीत घरफोडी व वाहन चोरी गुन्हे घडु नये म्हणुन तपास पथकातील पोलीस उपनिरीक्षक दत्ताजीराव मोहिते व कर्मचारी पेट्रोलींग करित असताना पोलीस कर्मचारी अमोल पवार यांना बातमी मिळाली की, हडपसर येथे आठ ते दहा इसमांनी सनी यादव यास पाच ते सहा दिवसाच्या पुर्वी कोयत्याने मारहाण केली असुन मारहाण करणाऱ्या इसमा पैकी पाच ते सहा जण कात्रज तळयावर आले आहेत. तेव्हा लागलीच तपास पथकातील स्टाफसह मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी जावुन खात्री करता त्याठिकाणी पाच इसम उभे असल्याचे दिसले तेव्हा त्यांना स्टाफच्या मदतीने ताब्यात घेवुन नाव पत्ता विचारता त्या इसमांनी त्यांची नावे १. शैलेश संजय कांबळे, वय २० वर्षे, धंदा वॉशिग, रा. घर नं. ६१२, गोल्डन ज्युबली , काशेवाडी भवानी पेठ पुणे २. चिक्या उर्फ कुलदिप हनुमंत तुपे, वय २१ वर्षे, धंदा काही नाही, रा. पुनम गार्डन बॅक साईट, बिबवेवाडी पुणे. ३. कृष्णा बाळुगोविंद राठोड, वय १९ वर्षे, रा. गल्ली नं .०१ काकडे वस्ती, अप्पर बिवेवाडी पुणे ४. पवण विकास ओव्हाळ, वय १८ वर्षे, रा.चैत्रबन वसाहत, माताजी सुपर मार्केटच्या शेजारी, बिबवेवाडी पुणे व एक अल्पवयीन असे सांगितली. त्यांना ताब्यात घेवुन पोलीस ठाणेस आणुन त्याच्याकडे संखोल तपास केला असता शैलेश संजय कांबळे यांची आत्या देवई अरुण बागवे रा. काशेवाडी भवानी पेठ पुणे हीने त्याला दोन महिन्यापुर्वी त्याच्या घरी बोलावुन घेतले होते. त्यावेळी तीची मोठी मुलगी नामे त्रृषाली हिने सनी यादव सध्या रा. ससानेनगर हडपसर पुणे पुर्वी राहणार काशेवाडी पोलीस चौकीच्या समोर पुणे यांच्या सोबत पळुन जावुन प्रेम विवाह केला आहे त्याला मारायचे आहे म्हणजे माझ्या दुसऱ्या मुली बरोबर कोणी प्रेम विवाह करणार नाही म्हणुन जावई सनी यादव याला मारायचे आहे. त्याला मारण्यासाठी कोणी मुले आहेत का हे पाहण्यासाठी सांगितले होते. त्यावेळी शैलेश कांबळेने त्याच्या ओळखीचे चिकु उर्फ कुलदीप तुपे रा पुनम गार्डनच्या मागे, बिबवेवाडी पुणे याला त्याची आत्या देवई अरुण बागवे हयाच्या बरोबर बोलणी करुन दिली होती. त्यावेळी चिकु उर्फ कुलदीप तुपे यांने ०१ लाख रुपयांला सनी यादव याला मारण्याची सुपारी घेतली होती. त्यापैकी २० हजार रुपये ॲडव्हॉन्स म्हणुन घेतले होते. त्यांनतर दि.१७/०६/२०१८ रोजी चिकु उर्फ कुलदीप तुपे आणि त्यांचे मित्र नामे पापा उर्फ कृष्णा, पवन ओव्हाळ, चंदन राठोड, प्रशांत साळवे असे व प्रशांत साळवे याचे चार मित्र यांच्यासह हडपसर ससाणेनगर येथे संतोष ऊर्फ सनी यादव हा काम करत असणाऱ्या स्नॅक सेंटरवर जावुन त्याच्यावर कोयत्याने वार केले व बाकी लोकांनी हातात सापडेल त्याने मारहाण करुन जखमी केले आहे. त्याबाबत हडपसर पोलीस ठाणेस चौकशी केली असता सदरच्या घटने बाबत हडपसर पोलीस ठाणे गु.र.न.७१३/२०१८ भा द वि कलम.३२६,१४३,१४७,१४८,१४९,३४ प्रमाणे दिनांक १८/०६/१८ रोजी गुन्हा दाखल आहे. सदर वरिल आरोपी यांना पुढील कारवाई करीता हडपसर पोलीस ठाणेस ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास हडपसर पोलीस ठाणे करित आहे.

सदर कामगिरी अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग पुणे मा.श्री रविंद्र सेनगावकर, परिमंडळ २ पुणे चे पोलीस उपायुक्त मा.श्री प्रविण मुंडे , स्वारगेट विभाग पुणे चे सहाय्यक पोलीस आयुक्त मा.श्री.डॉ.शिवाजी पवार यांचे मार्गदर्शनाखाली भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री कमलाकर ताकवले, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री राजकुमार वाघचवरे तपास पथकाचे अधिकारी पोलीस उप.निरीक्षक दत्ताजीराव मोहिते, पोलीस कर्मचारी पोलीस कर्मचारी अमोल पवार, कुंदन शिंदे, कृष्णा निढाळकर, शिवा गायकवाड, अभिजीत रत्नपारखी, महेश मंडलीक, चंदु फडतरे, दिपक माने, प्रणव संकपाळ, उज्वल मोकाशी, सर्फराज देशमुख, गणेश चिंचकर यांनी केलेली आहे.